रे.के.नं. ७८/२०१८
नि.क्र. ५३ /क लगत...

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | घनश्यामलाल राधेश्याम गुप्ता |
| वय | - | ५७ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| राहणार | - | नेरुळ |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. चव्हाण यांच्याद्वारे**

१. सन २०१७ मध्ये मी केंद्रीय आसुचना विभाग न्हावाशेवा कस्टम हाऊस येथे अधिक्षक पदावर कार्यरत होतो. मी तेथे मार्च २०१७ पासून कार्यरत होतो. त्यावेळी माझेकडे तपास करण्याचे काम असे. माझेकडे त्यावेळी एम.डी.ए लॉजीस्टीक्स या फाईल तपास सोपविण्यात आला. नोव्हेंबर २०१६ मध्ये एम.डी.एस.लॉजीस्टीक्स हे क्लीअरींग एजंट असून त्यांचे २१ कंटेनर पोर्ट वर आले होते. त्यामध्ये ड्राय खजूर हे होते. ते कंटेनर क्लीअरन्स करणेकरीता प्लॅन्ट ॲण्ड कॉरंटाईन चे प्रमाणपत्र लागते. क्लीअरींग एजंट च्या स्टाफने सादर केलेले प्रमाणपत्र हे नियमानुसार नव्हते, असा संशय तेथे असलेल्या क्लीअरींग अधिकारी उपआयुक्त श्री. आनंद गोखळे यांना आला. त्या प्रमाणपत्रात त्याची क्रमांकाची सिरीज वेगळी आढळून आली. त्यामुळे त्यांनी प्लॅन्ट आणि कॉरंटाईनच्या ऑफिस मधून ते प्रमाणपत्र बरोबर आहे किंवा नाही याची खात्री केली. त्यामुळे ते प्रकरण तपासणी करीता सी.आय.यु यांचेकडे पाठविण्यात आले. तेथे श्री. सनल नायर अधिक्षक, सी.आय.यु यांनी त्या प्रकरणाचा तपास केला. त्यांच्या तपासात ते प्रमाणपत्र खोटे व बनावट असल्याचे

आढळून आले. ते प्रमाणपत्र किशोर, संदेश परब व आणखी दोन कर्मचाऱ्यानी दाखल केले होते. त्यांची नावे आजरोजी मला आठवत नाही. ते चारही कर्मचारी एम.डी.एस लॉजिस्टीक्सच्या क्लीअरींग एजंट म्हणून काम करत असत. त्यानंतर श्री. सनल नायर यांनी योग्य अधिकाऱ्यांकडून प्रथम खबर दाखल करण्यास संमती  घेतली. त्याच वेळी श्री. सनल नायर यांची तेथून बदली झाली व त्यांचे जागेवर माझी नियुक्ती झाली. प्रकरणात दाखल असलेले दस्तऐवज व परवानगीचे आधारे मी फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. करीता फिर्यादीला **नि.क्र. P1/PW1** देण्यात येत आहे. आता मला प्रथम खबर दाखविली. त्यावर  माझी सही असून मजकूर बरोबर आहे. करीता प्रथम खबरीस **नि.क्र. P2/PW1** देण्यात येत आहे. आता मला मुद्देमाल क्र. १०/२०२५ कडील प्रमाणपत्र दाखविले. हे प्रमाणपत्र आरोपींनी क्लीअरिंग करीता दिलेले प्रमाणपत्र आहे. करीता सदर प्रमाणपत्राला **नि.क्र. P3/PW1** देण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र बनावटी असल्याने मी फिर्याद दाखल केली होती.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्याद्वारे...**

२. मी सन २०१४ पासून मार्च २०१७ या कालावधी जवाहरलाल नेहरु कस्टम हाऊस येथे नोकरीस होतो. कोणतेही कंटेनर आल्यावर ते क्लीअर करण्याकरीता निरिक्षक व अधिक्षक हे कर्मचारी असतात. या प्रकरणातील कंटेनर संबंधी कोणतीही कार्यवाही मी स्वत: केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, १०/११/२०१६ ते ३०/०३/२०१७ या कालावधीत मला आरोपींसंबंधी वैयक्तीक माहिती नव्हती. मी तपास अधिकारी म्हणून कस्टम विभागात काम केल्याने मला कस्टम कायदयातील तरतुदींची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, एखादे बनावटी दस्त सादर केल्यास कस्टम कायदयाच्या कलम १३२ प्रमाणे इन्पोर्टर व एक्पोर्टर हे

जबाबदार असतात. हे म्हणणे खरे आहे की, आयात व निर्याती संबंधी गुन्हा आढळून आल्यास कलम १०८ प्रमाणे संबंधीत व्यक्तीला समन्स काढले जातात. दि. १०/११/२०१६ ते ३०/०३/२०१७ या कालावधीमध्ये मी स्वत: कोणत्याही साक्षीदाराचे जबाब नोंद केले नाही. फिर्याद दाखल करण्यापुर्वी आरोपींना मी कारणे दाखवा नोटीस काढली होती किंवा नाही ते मला आठवत नाही. आरोपींविरुद्ध कस्टम कायदयानुसार कमिशनर ऑफ कस्टम यांचेकडे त्यावेळी काही प्रकरण चालू आहे किंवा नाही याची मी चौकशी केली नव्हती.

३. आयात केलेली कोणतीही वस्तू क्लेम करण्यासाठी त्याचे मालकास आधी चेकलिस्ट दाखल करावी लागते. तसेच त्यानंतर बील ऑफ एन्ट्री, सर्टीफिकेट ऑफ ओरीजीन, पॅकींग लिस्ट, बिल ऑफ लॅडींग हे सर्व दस्त दाखल करावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक वेळी आयात किंवा निर्यात करणारा व्यक्ती स्वत: हजर राहू शकत नसल्याने तो त्याचे वतीने एजंटची नेमणुक करतो. त्यांना कस्टम ब्रोकर असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, कस्टम ब्रोकर यांना पास दिला जातो. तो पास बहुतेकदा तीन प्रकारातील असतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक कस्टम ब्रोकर यांना क्रमांक दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, कस्टम ब्रोकर यांनी क्लीअरन्स करीता कागदपत्र सादर केल्यास त्या सादर करणाऱ्या ब्रोकरची सही घेतली जाते. ती सही कोणत्या व्यक्तीने कागदपत्रे दाखल केली याची जबाबदारी निश्चीत करण्यासाठी घेतली जाते. माझेकडे तपास आल्यानंतर मी मान्यता होऊन आलेले कागदपत्र वाचले किंवा नाही ते मला आठवत नाही. हे मला आठवत नाही की, कोणत्या कस्टम ब्रोकरने सही केली होती याची मी खात्री केली होती किंवा नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, दि. १०/११/२०१६ रोजी जेव्हा प्रमाणपत्र सादर केले गेले, त्यावेळी मी तेथे व्यक्तीश: हजर नव्हतो. सन २०१६ मध्ये ऑनलाईन

पद्धतीने बिल ऑफ एन्ट्री सादर केली जात असे. हे म्हणणे खरे आहे की, ओला खजूर व सुखा खजूर यामध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की, ओला खजूर आयात केल्यास सर्व संबंधीत कागदपत्रावर ओला खजूर आयात केल्याबाबत नमुद असते. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर फिर्याद सुखा खजूर संबंधी दाखल केली आहे. संबंधीत सर्व २१ कंटेनर क्लीअर केले किंवा नाही याची मी माहिती घेतली नव्हती. एखादा दस्त हा बनावटी आढळल्यास संबंधीत वस्तू निर्यात करण्याकरीता किंवा ती वापराकरीता बाजारात आणण्याकरीता परवानगी देणे संबंधीत अधिकारी हे निर्णय घेत असतात. हे मला माहित नाही की, ते सर्व २१ कंटेनर ओल्या खजूराचे होते. ते कंटेनर सुखे खजूर असल्याबाबत मला फाईल मध्ये असलेल्या कागदपत्रावरुन समजली. हे म्हणणे खरे आहे की, माझे कडे मिळालेल्या सर्व कागदपत्रांमध्ये ते खजूर सुखे खजुर असलेबाबत नमुद होते. नि. क्र P3/PW1 वरील दस्त हा मला तपासकामी मिळालेल्या कागदपत्रात होता. फिर्याद दाखल करण्यापूर्वी अंदाजे दोन आठवडयांपूर्वी माझेकडे सदर दस्त आले होते. मी फिर्याद देताना पोलीसांकडे कमिशनर यांनी दिलेले लेटर ऑफ अपरुवल दिले किंवा नाही ते मला आठवत नाही. एम.डी.एस लॉजीस्टीक याचे कस्टम ब्रोकरचे मालक कोण आहेत, याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक कस्टम ब्रोकरचे के.वाय.सी कस्टम कार्यालयामार्फत केली जाते. आरोपींवर जबाबदारी निश्चित करण्यापूर्वी एम.डी.एस कस्टम ब्रोकरचे मालक कोण आहेत, हे मी जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद केवळ माझे कडे आलेल्या कागदपत्रांचे आधारे दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, काय मजकूर नमुद करायचा हे मला सांगितले होते व त्यानुसार मी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल करण्यापूर्वी मला त्या २१ कंटेनर संबंधी वैयक्तीक माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा यागुन्हयाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. P3/PW1 वरील प्रमाणपत्राचा आरोपींसोबत कोणताही संबंध

नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे )

दिनांक – ०४/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण